# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक

### उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल


शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhekvp@Rediffmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.


क्र.सहसं /उशि /कोविप /नमवि/विअतु/२०११/४२/१४५६ दिनांक : १/११/२०११

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे, के.व्ही.पेंढारकर महाविद्यालय, डोंबिवली, ता.कल्याण , जि.ठाणे** येथे शासन आदेश क्र. एनजीसी २०११/(११८/११)/मशि-४, दि. ९/८/२०११ तसेच शासन आदेश क्र. एनजीसी २०११/(१२१/११)/मशि-४, दि. ३/८/२०११ नूसार पदव्युत्तरस्तरावर **एम.कॉम (ॲडव्हॉन्स अकाउण्टसी) व एम.एस्सी (इनऑरगॉनिक केमिस्ट्री - १ अतिरिक्त तुकडी)** या पारंपारिक अभ्यासक्रमाच्या विद्याशाखेस सन २००११-१२ या शैक्षणिक वर्षापासून उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील क्र. १ ते ६ प्रमाणे अटी व शर्तींना अनुसरुन कायम विना अनुदानित तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. शासन निणर्यातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था महाविद्यालयांकडून रु.१००/- च्या भारतीय गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम / महाविद्यालय/ विद्याशाखा/ तुकडी / विषय चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची आर्थिक मागणी केली जाणार नाही, असे हमीपत्र शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.तसेच दि.१७/१०/२०११ च्या पत्रान्वये संस्थेने प्रस्ताव सादरीकरणातील विलंबाबाबत खुलासा सादर केला आहे.

त्यानूसार "महाराष्ट्र विद्यापीठ कायदा -१९९४" अंतर्गत तरतुदीनूसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश तसेच प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या विगतवारीसह नियतकालिक आढावा, नॅक ऑक्रिडीएशन बाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानूसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याच्या अधिन राहून शासन निर्णयातील सूचनांप्रमाणे विद्यापीठाने या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नवीन महाविद्यालय / विषय / तुकडी / विद्याशाखा / अभ्यासक्रमांसाठी पुढील संलग्निकरणाची प्रक्रिया सुरु करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

स्थळ :- पनवेल, जि.रायगड
दिनांक :- १/११/२०११

प्र.सहसंचालक,
उच्च शिक्षण,कोकण विभाग, पनवेल यांचेकरिता

प्रत :-

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -३२ / एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - २० त्यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठांनी त्यांच्या संलग्निकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे / विद्याशाखांचे विहित शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबी पूर्ण करण्याच्या सूचना, तसेच **बार कौसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई / ए.आय.सी.टी.ई., नॅक यांचेकडील ना- हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना पुनश्चः उपरोक्त संस्थेच्या निदर्शनास आणून द्याव्यात.**

२. उपरोक्त मान्यता नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय/ तुकडया सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी **ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्षे झालेली नाहीत त्यांची ५ वर्षे पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रिडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल.** तसेच शासन निर्णयानूसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.